## मोजणी अर्ज निशाणी क्रमांक १९ खालील आदेश

(पारीत केलेला दिनांक **३०.०७.२०२२**)

**CNR No.MHLA140017242019**

०१. प्रस्तूत अर्ज वादीने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९ सह वाचनीय कलम ७५(ब)*** अनुसार उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून मौजे एकंबी तालुका औसा जिल्हा लातूर येथील भूमापन गट क्रमांक २२/अ क्षेत्र ०१ हेक्टर ७३ आर या वादीच्या मिळकतीचे संयुक्त निरीक्षण/मोजणी करुन नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक होण्यासाठी दाखल केला आहे.

### वादीचे अर्जातील मुख्य कथन खालीलप्रमाणे :-

०२. वादी वाद मिळकतीचा मालक व कब्जेदार आहे. वादीने खाजगी मोजणीदारामार्फत वाद मिळकतीची मोजणी केली असता त्याची दक्षिणेकडील १० आर जमीन ही प्रतिवादी क्रमांक ०१ च्या ताब्यात निघाली आहे.

०३. प्रतिवादी क्रमांक ०१ विरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत केला आहे. प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०४ यांची मोजणीस हरकत नाही.

०४. वादीतर्फे आणि प्रतिवादी क्रमांक ०१ तर्फे विद्वान विधीज्ञ युक्तिवादास गैरहजर. प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०४ तर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. एन. डी. म्हेत्रे** यांचा युक्तिवाद ऐकला.

०५. दोन्ही पक्षांचे कथन व कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तूत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थितीत झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | वादी ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९ सह वाचनीय कलम ७५(ब)*** अनुसार उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होण्यास पात्र आहेत असे सिध्द करतात काय? | **होकारार्थी.** |
| **०२.** | आदेश काय? | **अर्ज मंजूर केला.** |

## <u>**का र ण मि मां सा**</u>

### <u>**मुद्दा क्रमांक ०१ बाबत**</u> :–

**०६.** वादीतर्फे आणि प्रतिवादी क्रमांक ०१ तर्फे विद्वान विधीज्ञ युक्तिवादास गैरहजर.

**०७.** प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. म्हेत्रे** यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मिळकतीची मोजणी होण्यास त्यांची हरकत नाही.

**०८.** वादींनी वाद मिळकतीवर प्रतिवादी क्रमांक ०१ ने दक्षिण बाजूने १० आर अतिक्रमण केले आहे असे विशिष्ट कथन केले आहे. म्हणून मोजणी क्षेत्रातील तज्ज्ञांची नेमणूक करून मोजणी अहवाल मागितल्याशिवाय अतिक्रमण आहे किंवा नाही हे ठरविता येणार नाही. अतिक्रमण दूर करून ताबा मागणी केलेल्या दाव्यात उभय पक्षकारांना मान्य असलेला नकाशा किंवा आयोगाचा अहवाल व नकाशा अटळ आहे. वादींनी वादपत्रासोबत दाखल केलेल्या नजरी नकाशाला प्रतिवादींनी तीव्र आक्षेप घेतला आहे. म्हणून तज्ज्ञांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करुन मोजणी करुन नकाशा व अहवाल प्राप्त केल्याशिवाय वाद कायमपणे संपणार नाही असे दिसते.

**०९.** उभयतांनी त्यांचे मालकी हक्काचे दस्ताऐवजासह ते ज्या महसूल किंवा इतर कागदपत्रांवर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या ०२ प्रमाणित/सत्य प्रती, एक न्यायालयासाठी, ०१ न्यायालयीन आयुक्तांना देण्यासाठी व ०१ छायांकीत प्रत विरु–ध्द पक्षांना देण्यासाठी दाखल करण्याचा आदेश देणे उचित होईल.

**१०.** म्हणून वादीने आयुक्ताचा खर्च देण्याच्या अटीवर उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्याचा आदेश पारित करणे न्यायाचे होईल. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०१** ला **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**११.** म्हणून **मुद्दा क्रमांक ०२** ला उत्तर देण्यासाठी खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>अंतिम आदेश</u>

०१. वादीने ***<u>दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम २६ नियम ०९ सह वाचनीय कलम ७५(ब)</u>*** अनुसार **मौजे एकंबी तालुका औसा येथील भूमा–पन गट क्रमांक २२/अ क्षेत्र ०१ हेक्टर ७३ आर** या वाद मिळकतीचे नि–रीक्षण /मोजणी करुन नकाशा व अहवाल दाखल करण्यासाठी उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होण्यासाठी दाखल केलेला अर्ज **<u>नि.क्र.१९</u>** मंजूर करण्यात येत आहे.

०२. न्यायालयीन आयुक्त यांनी आयुक्त पत्र मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत नकाशा व अहवाल दाखल करावा.

०३. वादीने उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, औसा यांच्या कार्यालयात त्यांच्या सूचनेनुसार आवश्यक शुल्क नियमाप्रमाणे अदा करावे व आयुक्त पत्र विनाविलंब जारी करण्यासाठी शुल्क पावतीची सत्य प्रत अभिलेखावर दाखल करावी.

०४. वादीने ते ज्या मालकी हक्क दस्तऐवज व महसूल आणि इतर कागदपत्रावर भरवसा ठेवतात अशा कागदपत्रांच्या २ प्रमाणित/सत्यप्रती व १ छायांकीत प्रत दाखल करण्याचा निर्देश देण्यात येतो.

**०५**. आयुक्तांला **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ७५ ते ७८ क्रम २६ व अंतर्गत नियम तसेच दिवाणी व्यवहार नियमावलीतील प्रकरण क्रमांक ०८ परिच्छेद १५१ ते १७०** व महसूल नियमातील आवश्यक नियमांचा अवलंब करुन आयुक्ताचे कार्य सत्वर पूर्ण करण्याचे व मोजणी नकाशा व अहवाल दाखल करण्याचे निर्देशित करण्यात येते. आयुक्तांचे काम काही अपरिहार्य कारणामुळे ठरवून दिलेल्या मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही तर न्यायालयीन आयुक्त उपरोक्त मुदत संपण्यापुर्वी न्यायालयाकडे लेखी अर्ज करुन मुदत वाढ मागू शकतात.

**०६**. उभय पक्षांना जातीने अथवा विधिज्ञांमार्फत न्यायालयीन आयुक्ताने नेमलेल्या तारखेला व वेळी हजर राहण्याचे निर्देशित करण्यात येते.

**०७**. न्यायालयीन आयुक्ताला उभय पक्षांना आयोगाचा ठरलेला दिवस, तारीख व वेळेची सूचना वादपत्राच्या सरनाम्यातील पत्त्यांवर नोटीसा काढून कळविण्याबाबत निर्देशित करण्यात येते.

**०८**. वादीने न्यायालयीन आयुक्ताला आयोगाचे स्वरुप व हेतूचे आकलन होण्यासाठी वादपत्र व कैफीयतीच्या प्रमाणित प्रती देण्याचे निर्देशीत करण्यात येते.

**०९.** जर आयोगाच्या ठरलेल्या दिवशी, तारखेला व वेळी कोणताही पक्ष गैरहजर राहिल्यास न्यायालयीन आयुक्तांनी तसा पंचनामा करुन आयोगाचे कार्य उपस्थित पक्षकारांसमक्ष पूर्ण करावे.

**१०.** वादीने अंतिम आदेश कलम ०३, ०४ आणि ०८ ची पुर्तता तात्काळ करावी.

**११.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2022.08.01 10:46:11 +0530

दिनांक : **३०.०७.२०२२**. **(श्री. एस. एल. फुले.)**

ठिकाण : औसा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.